ISSN : 2278-9308

# Sanshodhan Samik

*Humanities, Social Sciences, Commerce, Education, Law and Language*

*Monthly*

## Peer Reviewed International Research Journal

## Special Issue - August-2015




■ Chief Editor - Prof. Virag S. Gawande
■ Editor-Dr.Dinesh W.Nichit ( Commerce )
■ Editor - Dr. Sanjay J. Kothari ( Social Sciences)

- PUBLISHED BY -

AADHAR SOCIAL RESEARCH & DEVELOPMENT TRAINING INSTITUTE, AMRAVATI, MS.

| | | | |
|---|---|---|---|
| 33 | प्रा.डॉ.शिवाजी महादेव होडगे. | धनगरी ओवी गीतातील सामाजिकता | 139 |
| 34 | डॉ.ज्ञानेश गजाननराव सोनोने | किमान आधारभूत किंमतीतील तफावत आणि आजची शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती | 144 |
| 35 | डॉ. सुनीता चारुदत्त लेंगडे | राष्ट्रसंतांची सामाजिक भूमिका | 150 |
| 36 | कु. सीमा लालचंद गोलाईत | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार | 154 |
| 37 | प्रा.राठोड नाथिराम लक्ष्मण | रायगड जिल्हयातील आदिवासीच्या आर्थिक विकासाच्या शासकीय योजनाचा चिकित्सक अभ्यास | 160 |
| 38 | प्रा. डॉ. वाय एम. साळुंके | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कामगार चळवळतील भूमिका | 164 |
| 39 | प्रा.डॉ.कदम संतोष तुकाराम | लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील लोकनाटयातून संयुक्त महाराष्ट्र चळवळ' | 167 |
| 40 | सहा.प्रा.सुभाष लक्ष्मण भालेराव | विमा विधेयक २०१५ एक चर्चा | 170 |
| 41 | माधुरी पहरामण काठे | पुणे व ठाणे जिल्हयातील आदिवासी लोकसंख्येच्या वितरणाचा तुलनात्मक अभ्यास | 173 |
| 42 | प्रा.डॉ.सौ.यु.आर.पाटील | मराठी संत कवयित्रिंचे साहित्यातील योगदान | 179 |
| 43 | प्रा. डॉ. सुनिता श्री. बाळापुरे | गृहव्यवस्थापन : नोकरी करणाऱ्या महिला करीता समस्या | 183 |
| 44 | प्रा. डॉ.सौ.शुभांगी परांजपे | दत्तमाहात्म्य | 187 |
| 45 | प्रा. डॉ. जे.व्ही. गायकवाड | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारताच्या विकासासाठी आर्थिक तत्वज्ञान | 193 |
| 46 | विलास भाऊरावजी फरकाडे | अफजलखानाच्या वधातील राजमाता जिजाबाईची भूमिका – एक ऐतिहासिक अध्ययन | 196 |
| 47 | प्रा. प्रेमसिंग मानसिंग गिरासे | शाहिरी वाङ:मयाचे स्वरूप आणि शाहिरी वाङ:मय व समाज जीवन | 202 |
| 48 | प्रा. डॉ. हिराजी बनपूरकर | राष्ट्रसंतांच्या साहित्यातील संदेश | 206 |
| 49 | प्रा. केशव सुर्यभानसा गुल्हाने | जागतीक व्यापार संघटना आणि शाश्वत शेती विकास | 214 |

ISSN - 2278-9308

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कामगार चळवळतील भूमिका

प्रा. डॉ. वाय एम. साळुंके
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओझर मिग, ता. निफाड जि. नाशिक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कायदे पंडीत अर्थतज्ञ होते.अभ्यासकांनी त्यांच्या सामाजिक, धर्मविषयक, चळवळींचा व संविधान कार्याचा मोठयाप्रमाणात अभ्यास केला परंतु या शिवाय बाबासाहेबांनी कामगार या वर्गासाठी महत्त्वपूर्ण काम केले आहे. या चळवळीवर फारसा प्रकाश टाकला गेलेला दिसत नाही. या कामगार चळवळीतील बाबासांहेबांची भुमिका मोठीहोती त्यांच्या कामगार विषयक भुमिकेतुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रियाशीलसमाजकर्तेहोतेहे लक्षात येईल. इ.स.१९०८ पर्यंत भारतातील कामगार दररोज १५ तास काम करतहोते अशा रितीने या कामगारांना शारिरीक व मानसिक श्रम देऊन त्याच्या मोहबदला कमी प्रमाणात मिळतहोता. असा हा वर्ग की जो श्रम विकुन भांडवलदारांच्या भांडवलात वाढ करतहोता.

इ.स. १८९० मध्ये"मुंबई गिरणी कामगार संघ" नावाची संस्था (Bombay Milshands Association) नारायण मेघाजी लोखंडे यांनी स्थापन करून कामगारांना अडचणी अर्ज विनंत्याद्वारे सरकार दरबारी मांडल्या परंतु पुढील काळात स्थापन झालेल्या वेगवेगळया कामगारसंघटनांनी मात्र इंग्रज व भांडवलधार्जिने धोरण ठेवल्याने कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडली नाही. परंतु पुढे श्रमिकांविषयी तळमळ असनारे व कामगार ऐक्याचा पुरस्कार करणारे, कम्युनिष्ठ विचार सरणीचे गाढे अभ्यासक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठीव न्याय मिळवून देण्यासाठीच १५ ऑगस्ट १९३६ रोजी "स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. (१)

**स्वतंत्र मजूर पक्ष :-**

डॉ. आंबेडकरांनी ज्याच्या माध्यमातून आपली कामगार चळवळ राबविली त्या स्वतंत्र मजूर पक्षाची उदिष्टे व धोरणे सर्वसमावेशक होती. त्यात कामगारांच्या कामाचे तास कमी करून मजुरीची किमान मर्यादा ठरविणे कारखाण्यातील व गिरण्यातील कामगारांच्या नोकरीची शाश्वती व बढती या बाबत कायदेशिरतरतूद करणे. कामाचे योग्य वेतन, कामगारांना स्वस्त घर उपलब्ध करून देणे, अपघाती नुकसान भरपाई व पेन्शन देणे, कामगारांच्या मुलांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे इ.

स्वतंत्र मजूर पक्षाने दलित, शेतमजूर किंवा असंघटित कामगार या विषयी निश्चित आणि खंबीर भुमिका घेतलीहोती. डॉ. आंबेडकरांना वाटत होते की, कम्युनिष्ठ पक्ष हासकृत दर्शनी जरी कामगारांच्या हितासाठी लढतो आहे. असे वाटत असलेतरीत्यांची कामगार चळवळ राजकीय ध्येयासाठी दिसते. हा दुष्टीकोणकामगार चळवळीला अत्यंत मारक आहे.

**बहिष्कृत कामगारांचा प्रश्न :-**

मुंबईत गिरणी कामगारांचा १९२८ मध्ये संप झाला संपाचे कारणहोते कापड गिरणीतीलस्पृश्य कामगार अस्पृश्य वर्गातील कामगारांबरोबर काम करण्यास तयार नव्हते. या प्रश्नावर सरकारनेसर चार्लस फॉसेट, मुंबई हायकोर्टाचे जज्ज, एम.पी. खारेगाट व बाळकृष्ण कामत यांची कमिटी नेमली अस्पृश्य कामगारांना मिळणारीवागणूक पाहून डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत वर्गातील कामगारांनी जोराने चळवळ करावी असे अहवान केले दलित कामगारांच्या सामाजिक प्रश्नाकडे दुर्लक्षहोत असल्यामुळे दलित कामगारांनी स्वतंत्र संघटना उभारावी असे त्यांना वाटत होते. कारण जगातलेसारे कामगार एक आहेत. अशी घोषणाहोत असलीतरी व्यवहारात मात्र स्पृश्य व अस्पृश्य कामगार असा भेद केला जात होता. (२)

**कामगार विरोधी विधेयकाचा निषेध :-**

इ.स. १९३८ मध्ये मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनी विधीमंडळात औद्योगिक विभागविषयी एक विधेयक मांडले या विधेयकात समजूतीने व लवादामार्फत कामगारांचेतंटे सोडवावेत आणि संपकरण्याचा हक्क

कामगारांना नसल्यामुळे त्यांना त्याबद्दल शिक्षा करणेही गोष्ट कायद्याच्या विरूध्द नाही. इ. घटक या विधेयकात होती. या विधेयकाला कामगार नेत्यांनी काळा कायदा म्हटले डॉ. आंबेडकर या विधेयकावर विधी मंडळात मोठी टीका केली. ते मृणाले कामगार आपल्या मागण्या मिळवण्यासाठी संपकरतात या बिलाने कामगारांचे नागरी स्वातंत्र्य हिरावून घेतल्या जाणार आहे. हे बिल लोकशाहीची थट्टा करणारे आहे. डॉ. आंबेडकर या विधेयकावर केवळ टीका करून थांबले नाहीत. या विधेयकाचा निषेध करण्यासाठी १६ ऑक्टो. १९३८ रोजी मुंबईतील प्रमुख कामगार संस्थाच्या विद्यमाने स्वतंत्र मजूर पक्ष व ट्रेड युनियन काँग्रेसतर्क बॅ. जमनादास मेहता यांच्या अध्यक्षतेखाली कामगारांची एक संयुक्त परिषद परळच्या कामगार मैदानावर भरवली मुंबईतील ६० कामगारसंघटनांनी यामध्ये भाग घेतलाहोता. या सभेला संबोधीत करतांना डॉ. आंबेडकर मृणाले "मुंबई सरकारने केवळ मालकांना खुश करण्यासाठी सदरबिल पास करून कामगारांची एक प्रकारे कत्तल केली आहे. त्याचा निषेधम्हणून आपण एक दिवसाचा संप घडवून आनणार आहोत कामगार व मजूर यांनी या संपात सहभागी होवून अत्यंत शांततेच्या मार्गाने आपल्या शक्तीचे प्रदर्शनजगाला दाखवून दयावयाचे आहे." डॉ. आंबेडकरांना कामगारांविषयी तळमळहोती म्हणुनचत्यांनी या बिलाला विरोध करून एक दिवशीय संप यशस्वी करून दाखविला.

**शेतकरी व शेत मजुरांचे नेतेः-**

डॉ. आंबेडकर हे केवळ कारखाण्यात काम करणाऱ्या कामगारांसाठीच लढा देतहोते असे नाहीतर शेतकरी आणि शेतमजुर यांच्या प्रश्नांसाठी लढा देतहोते. कोकणात अस्तित्वात असलेल्या खोत पध्दतीच्या विरूध्द डॉ. आंबेडकरांनी आवाज उठवला खोत म्हणजे गावातील एक लहनसासुलतानचहोता. या खोतला शेतकरीसरकारच्या कराबरोबर वेगळा कर देत असल्याने शेतकऱ्यांवर कराचा बोजा वाढला होता. त्याच प्रमाणे खोत शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळु देत नव्हता. शेतकऱ्यांनी चांगले कपडे वापरू नये अशीसक्तीहोती. अशा गुलामगिरीला विरोध करण्यासाठी १४ एप्रिल १९२९ रोजी चिपळुन येथे शेतकरी परिषद भरविण्यात आली. या परिषदेच्या अध्याक्षपदावरून संबोधीत करतांनाडॉ. आंबेडकर म्हणाले की, शेतकरी वर्ग आज खोती पध्दतीमुळे गुलामगिरीत खितपत पडला आहे. सरकारने त्यांना न्याय दिला पाहिजे शेतकऱ्यांनी आपला स्वाभिमान जागुन वरिष्ठांचीहलकीसलकी कामे करून स्वतःचा समाजिक दर्जा मुळीच कमी करून घेवू नये.

या परिषदेमध्ये डॉ. आंबेडकरांचा अध्यक्षतेखाली एक ठराव पास करूनया खोती पध्दतीचा निषेध करण्यात आला. या ठरावाच्या अंमल बजावणीसाठी डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली १० जाने १९३८ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाने मुंबईत २० हजार शेतकऱ्यांचा मोर्चा विधान मंडळावर नेला यावेळी जमीन कसणाऱ्यांना त्याच्या मेहनतीचे फळ मिळाले पाहीजे अशी प्रमुख मागणी केली. अशा रितीने डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाद्वारेश्रमजीवी वर्गाच्या समस्या मांडल्या.

**रेल्वे कामगार परिषदः**

रेल्वे कामगारांच्या समस्यांबाबत आवाज उठवण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी मनमाड जि. नाशिक येथे १२ व १३ फेब्रु १९३८ रोजी रेल्वे परिषद घेतली. या परिषदेला २० हजार रेल्वे कामगार उपस्थित होते या मध्ये दलित कामगारांची संख्या जास्त होती या परिषेदच अध्यक्ष पदावरून बोलतांना डॉ. आंबेडकर म्हणतात "मजूरांच्या संघटनेची दोन शत्रु आहेत. एक म्हणजे ब्राम्हणशाही व दुसरा म्हणजे भांडवलशाही दोन ब्राम्हणशाही ही कामगारांना जाती जातीत फोडते ब्राम्हणशाही म्हणजे ब्राम्हण वर्ग नव्हे तर समता, ऐकय व बंधुत्व या तत्वांना काळे फासणारे मनहोय. भांडवलशाही नफ्याच्या मागे लागुन कामगारांचे रक्त शोषुनघेते. ब्राम्हणशाही मुळेच गिरणीकामगारात ऐक्यहोत नाहीतसेच रेल्वे कागार वर्गात दलित कामगार वर्गाची स्थिती वेगळी नाही. दलित रेल्वे कामगारफक्त गॅगमनच होवु शकतात व ते शेवट पर्यंत गॅगमनच राहतात त्याला पोर्टरहोता येत नाही. कार पोर्टरहास्टेशनणमास्टर च्या घरचीकामे नोकरीचा भाग म्हणूनकरीत असतोत्यामुळेतेथे अस्पृश्य चालत नाही ब्राम्हणशाही शत्रु मुळेकामगारात फुटपडुन कामगार चळवळ नष्ट होवू शकतेत्यामुळे कामगारांनी जागरूकराहुनआपआपसात ऐकयसाधुन कामगार चळवळ ताकदवान केली पाहिजे. कामगारांनी आपल्या हितसाठी, संरक्षणासाठी राजकारणात शिरले पाहिजे त्या शिवाय कामगारसुधारणा शक्य नाही (३) थोडक्यात कामगार राज्यकारभारात आल्याशिवाय त्याच्या जीवनातील गुलामगिरीसंपणार नाही. असे डॉ. आंबेडकरांना वारत होते.

डॉ. आंबेडकरांनी २० जुलै १९४२ रोजी मजूर मंत्री म्हणूनसुत्रेहाती घेतली श्रमिक जनतेचासंरक्षक व उध्दारक म्हणूनत्यांनी खुप महत्त्वाची भुमिका बजावली कामगारांच्या सामाजिकसुरक्षितेसाठी कामगार चळवळ उपक्रमशील वाढविण्यासाठी, मालक-मजूरसहकार्य संबंध निर्माण होणेसाठी डॉ. आंबेडकरांनी काही परिषद घेतल्या त्यापैकीच एक त्रिपक्ष कामगार परिषदहोय. त्रिपक्ष कामगार परिषद म्हणजे कामगार-मालक-सरकार यांची इंडीयन लेबर कौन्सिलहोय ६ व ७ ऑगस्ट १९४५ रोजी भरलेल्या त्रिपक्ष कामगार परिषदेच्या उदघाटन करतांना डॉ. आंबेडकर म्हणाले "मजुरविषयक कायदा करणे औद्योगिकतंटे मिटवण्यासाठी एक पध्दती तयार करणे, सर्व भारतात असलेल्या मालक-मजूर यांचे संबंधित प्रश्नांची चर्चा करणेही मालक-मजूर यांचीतीन समान उदिष्ठे आहेत. त्या दृष्टीने मालक-मजूर-सरकार यांनी एकत्रीत येवून मालक-मजूर यांच्या समजूतीचे वातावरण निर्माण केले पाहिजे"

मजूरमंत्री असतांना डॉ. आंबेडकरांनी कामगार युनियनच्या बाबतीत धोरण ठरवितांना मालकाने कामगारांच्या युनियन्सला मान्यता दिली पाहिजे आणि कामगार युनियन नेहमी मान्यतेसाठी आवश्यक त्या गोष्टीची पुर्तता करावी. त्याच प्रमाणे मालकाने युनियणला मान्यता दिली नाहीतरतो दडनीय गुन्हा ठरविला जाईल अशा प्रकारचे विधेयक मांडून कामगारहीताचे धोरण मांडले. कामगारांना महागाई व नुकसानभरपाई भत्ता दिला पाहिजे या बाबत आग्रह धरलाहोता. स्त्री कामगारांना प्रस्तुतीचे फायदे देतांना मजूर मंत्री म्हणून डॉ. आंबेडकरांनी काहीतरतुदी केल्या होत्या त्यात त्यांना कामगारस्त्रीही प्रसुतीपूर्व दहा आठवडे काम करण्यात परवागनी नाकारली प्रसूतीनंतर चार आठवडे तिने पूर्ण विश्रांती घ्यावी. अशा प्रकारचे विधेयक मांडुनस्त्री कामगारांविषयी त्यांनी आपुलकी दाखवुन भारतीय स्त्री प्रश्नाला वाचा फोडून न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. (४) डॉ. आंबेडकरांनी कामगारांसाठी आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचललेलेहोतेते म्हणजे कामगारांना पुर्ण पगारी सुट्टी देण्याचे दुरूस्ती विधेयक तयार केलेहोते. कामगार विषयक दृष्टीकोणातुन विधीमंत्री असतांना कामगार विषयक १९४७ चा औद्योगिक कलह कायदा, १९४८ चा कारखाने अधिनियम, १९४८ चा किमान वेतन इ. कायदे करून आपली कामगार विषयक भुमिका अत्यंत नम्रपणे बजावली आज कामगारांना जेहक्क मिळाले आहेत त्या मागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा निश्चित मोठा सहभाग हे मान्यच करावे लागते.

**संदर्भ साधने**

१) कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद, २००९

२) कठारे अनिल, फुले-शाहु-आंबेडक, पुनम प्रकाशन, कंधार, २०११

३) गायकवाड प्रदिप (संपा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर समग्रभाषणे खंड १ ते १०, शितीज पब्लिकेशन, नागपुर, २००१-२००३.

४) गायकवाड प्रदिप (संपा), कामगार चळवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची निवडक भाषणे व लेख, नागपूर, शितिज पब्लिकेशन, नागपूर, जि. आहमदनगर-२००६